# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०८/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

**पो.स्टे. रामटेक हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड**
**—: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—**

दिनांक २१/०८/२०२४ रोजी पोस्टे रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील वाहीटोली पाचगाव शिवार येथील एका झोपडीमध्ये काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे रामटेक येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी वाहीटोली पाचगाव शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) विकास चंदनबटवे, वय ३० वर्ष रा. विनोबा भावे वार्ड रामटेक २) संतोश चौधरी वय ५० वर्ष ३) मनोज झाडे, वय ३८ वर्ष रा. शितलवाडी ४) पंकज कांबडे वय ४३ वर्ष रा शितलवाडी ५) गजानन साठवणे, वय ४३ वर्ष रा. शितलवाडी ६) नरेंद्र कामडी वय ४२ वर्ष ७) उमेश भलावी वय २८ वर्ष रा शितलवाडी ८) आकाश यादव, वय २३ वर्ष रा. शितलवाडी** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन अंगझडतीतून नगदी रक्कम १०८००/— रू व डावावर २५५० रू तसेच तासपत्ते ५२ एकूण मुद्देमाल १३०५०/— रू चा मुददेमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोहवा गजानन माहुरे, पोना प्रफुल रंधई, पोअं. सुभाष बावनकर, शिवशंकर भोयर यांनी पार पाडली.

## कार अपघातात दोघांचा मृत्यु
## आरोपीस रामटेक पोलीसांनी केली अटक

दिनांक २१/०८/२०२४ चे ११.४५ वा. ते १२.१५ वा. दरम्यान मौजा रामटेक ते मौदा रोडवर साई ढाबा जवळ रामटेक जि. नागपुर येथे स्विफ्ट डिझायर कार क्र. सी. जी. ०४ एन.एच. ६५१५ चा चालक **आरोपी नामे—शंकर किशोर जयस्वानी वय ३३ वर्षे रा. कटोरा तलाव जि. रायपुर** याने आपल्या ताब्यातील कार विरूध्द दिशेने दारू पिवुन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल क्र. एम.एच—३६/ए.एम—११७५ चा चालक **मृतक नामे— १) सचिन मुलचंद ठकरेले, वय ३० वर्षे दोन्ही रा. हमलापुरी** सोबत **२) सौ. विजया भिमरावजी ठकरेले वय ५२ वर्षे** यांना जोरदार धडक मारून गंभीर जखमी करून दोघांचे मरणास आरोपी कार चालक कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— बालचंद दशरथ ठकरेले, वय ६९ वर्षे रा. हमलापुरी जि नागपुर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे आरोपी कार चालक यांचेविरूद्ध कलम १०५, २८१ बी एन एस सहकलम १८५, ४, १२२ मो.वा. का. अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर कार चालक आरोपीस रामटेक पोलीसांनी अटक केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि स्वाती यावले या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**